# कमला कॉलेजला युजीसीकडून दीड कोटी

## शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी अनुदान

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**

नवी दिल्ली येथील विद्यापीठ अनुदान आयोगमार्फत (युजीसी) कॉलेज वुईथ पोटेंन्शियल फॉर एक्सलन्स योजनेतंर्गत ताराराणी विद्यापीठाच्या कमला कॉलेजची निवड करण्यात आली. यानुसार कॉलेजला शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी युजीसीकडून दीड कोटी रूपयांचे अनुदान मंजूर करण्यात आले, अशी माहिती संस्थेचे सचिव प्राचार्य डॉ. क्रांतीकुमार पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली. या निवडीची माहिती युजीसीच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

डॉ. पाटील म्हणाले, 'या योजनेसाठी देशभरातील एकूण ३५० महाविद्यालयांनी प्रस्ताव युजीसीकडे पाठवले होते. त्यापैकी २४० महाविद्यालयांची युजीसीतर्फे प्रत्यक्ष मुलाखतीसाठी निवड करण्यात आली होती. त्यातून देशपातळीवर १२४ महाविद्यालयांची कॉलेज वुईथ पोटेंन्शियल फॉर एक्सलन्स दर्जासाठी अंतिम निवड करण्यात आली. यामध्ये महाराष्ट्रातील २८ महाविद्यालयांचा समावेश असून शिवाजी विद्यापीठातील तीन महाविद्यालायांचा समावेश करण्यात आला आहे. कोल्हापूर जिल्ह्यातून या वर्षासाठी निवड होणारे कमला कॉलेज हे एकमेव कॉलेज आहे.' 'तसेच स्वायत्त विद्यापीठ होण्याच्या दृष्टिने पहिले पाऊल म्हणून या दर्जाचा उपयोग केला जाईल,' असेही डॉ. पाटील म्हणाले.

संस्थेचे उपाध्यक्ष एस.एन. पवार म्हणाले,' कमला कॉलेजमध्ये महिलांसाठी विविध अभ्यासक्रम सुरू आहेत. तसेच महिला आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हाव्यात यासाठी बी. व्होक हा अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे. रोजगाराभिमुख अभ्यासक्रमांच्या माध्यमातून मुलींना स्वताच्या पायावर उभे राहण्यासाठी प्रोत्साहन दिले जात आहे. कॉलेजच्या स्थापनेपासून आजपर्यंत केलेल्या शैक्षणिक सुविधा, विस्तार, काळानुरूप तयार केलेले अभ्यासक्रम यांची दखल घेऊन कॉलेजला हा विशेष दर्जा युजीसीने दिला आहे.'

डॉ. जे. बी. पाटील म्हणाले, 'यापुढील काळात कॉलेजच्या कामगिरीचा दर्जा उंचावण्यासाठी महाविद्यालयाला या योजनेतून मिळणाऱ्या अनुदानाचा फायदा होणार आहे. त्याद्वारे अध्ययन, अध्यापन, संशोधन, संगणकीकृत ग्रंथालय, ई जर्नल विस्तार, स्पर्धा परीक्षा, खेळ, सांस्कृतिक, व्यक्तिमत्व, नेतृत्वशिबिर, संशोधनवृत्ती, संस्कृती विकसन यासाठी फायदा होणार आहे. यामधून निर्माण होणाऱ्या सुविधांमुळे कॉलेज येत्या तीन वर्षात उत्कृष्टतेकडे वाटचाल करून या योजनेसाठी झालेली निवड सार्थ करून दाखवेल.'